Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P012

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय संस्कृतीत भारतीय ज्ञान परंपरेचे महत्व

**प्रा. अनिल गावंडे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य
(सायंम) महाविद्यालय, नागपूर
मोबाईल न- ९०२१२०४६९७
E-mail – anilgawande1181@gmail.com

**सारांश :-**
भारतीय संस्कृतीत भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व खोलवर रुजलेले आहेत. कारण यामध्ये तत्त्वज्ञान, विज्ञान, कला, धर्म, जीवनशैली यांचा समावेश आहे. ज्ञान हा संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक आहे. सर्वच समाजाच्या संस्कृतीमध्ये भौतिक आणि सामाजिक विश्‍वास संबंधीच्या ज्ञानाचा समावेश आहे. ज्ञान हे एका पिढीकडून दुस-या पिढीकडे हस्तांतरित होत असते. भारतीय ज्ञान प्रणाली द्वारे (IKS) ज्ञान संबंधित प्रणाली आणि ज्ञान हस्तांतरणाची एक पद्धत आहे. वैदिक साहित्य, उपनिषदे, वेद आणि उपवेद हे भारतीय ज्ञान व्यवस्थेचा पाया रचतात. भारतात हजारो वर्षापासून विकसित झालेल्या ज्ञानप्रणालींची समृद्ध परंपरा आहे.

**बीजसंज्ञा :-**
संस्कृती, ज्ञानपरंपरा, मराठी भाषा, उपनिषदे, धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, कला, वैदिक साहित्य, विश्‍वास, मुल्ये व प्रमाणके, चिन्हे, तंत्रज्ञान, पिढी इत्यादि.

**प्रस्तावना :-**
भारतीय ज्ञानपरंपरा ही अत्यंत समृद्ध अशी आहे. ज्ञान आणि विज्ञान, लौकिक आणि परलौकिक, कर्म आणि धर्म तसेच भोग आणि त्याग यांचा अद्‌भुत समन्वय भारतीय ज्ञाना परंपरेत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (2020) मध्ये भारतीय ज्ञानपरंपरेवर भर देण्यात आलेला आहे. अनेक रुढी, प्रथा, परंपरागत चालत आलेल्या असतात. त्या कुठेही लिहून ठेवलेल्या नसतात. पारंपारिक ज्ञान काही भाग सुत्र रूपाने, सिद्धांत रूपाने, ग्रंथित केले गेले आहे. त्या ग्रंथा मधून विविध शास्त्र, विज्ञान किंवा तत्त्वज्ञान सांगितले आहे. या ग्रंथबध्द ज्ञानाला 'भारतीय ज्ञान संस्था' असे म्हटले जाते. ही ज्ञान परंपरा अतिशय प्राचीन आहे. आणि तिचा ओघ अखंड वाहत आहे.

**अध्ययनाचा उद्देश्य :-**
१. भारतीय संस्कृतीत ज्ञानपरंपरेचे महत्त्व जाणून घेणे -
2. वैदिक साहित्य, उपनिषदे, वेद आणि उपवेद यांचा अभ्यास करणे -
3. भारतीय संस्कृतीत भौतिक आणि सामाजिक विश्‍वास संबंधीची माहिती मिळवणे -
4. अनुभव, निरीक्षण, आणि विश्‍लेषणातून विकसित झालेली पद्धती म्हणजे ज्ञान प्रणाली होय -
5. भारतीय ज्ञान प्रणालीचा उद्देश सर्वांगीण विकास करणे –

**अध्ययनाची गृहितके :-**
१. भारतीय संस्कृतीत भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्त्व खोलवर जसलेले असून यामध्ये तत्वज्ञान, विज्ञान, कला, धर्म, जीवनशैली यांचा समावेश होतो.
2. भारतीय या ज्ञान प्रणाली ही ज्ञान संघटित प्रणाली आणि ज्ञान हस्तांतरणाची एक पद्धती असून विकसित झालेल्या ज्ञानप्रणालींची समृद्ध परंपरा लाभलेली आहे
3. भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये सर्व सजिव आणि संपूर्ण विश्‍वाच्या परस्पर संबंधावर आणि परस्परावलंबनावर भर दिला जातो.

**संशोधन पद्धती :-**
प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम स्त्रोतावर आधारित असून प्रकाशित पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे व वेबसाईटचा इत्यादी स्त्रोतांच्या आधारे तथ्य संकलन केले आहे. यात वर्णनात्मक आराखडयाचा अवलंब केलेला आहे भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) याविषयी पुस्तके, संकेतस्थळे, समाज माध्यमे, दूरसंचार साधने अशा विविध साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**भारतीय संस्कृती :-**
भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, विलक्षण भुगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यमुळे आकारास आलेली आहे. शेजारच्या देशातील चालीरीती, परंपरा व कल्पना सामावून घेत भारतीय संस्कृतीने सिंधू संस्कृती दरम्यान जन्माला आलेले तसेच वैदिक काळात, दक्षिण भारतातील लोह युग काळात, बौद्ध धर्माच्या उद्भव आणि –हासाच्या काळात तसेच भारताचे सुवर्णयुग मुसलमानी आक्रमण व युरोपियन देशांच्या वसाहती दरम्यान झालेले बदल पचवून देखील स्वतःचे परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे.

भारतीय संस्कृतीने तिच्या इतिहासाने, अद्वितीय भौगोलिक रचनेने, वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा व कल्पना स्वीकारून तसेच पुरातन परंपरा जपुन आकार घेतला आहे. भारतात जागोजागी वेगवेगळ्या धर्मांचे, भाषेचे, परंपरा जपणारे लोक आढळून येतात. विविधतेतून एकता हे भारतीय संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. देशभरात पसरलेल्या विविध उपसंस्कृती आणि हजारो वर्षांच्या परंपरा यांची एकत्रित वळलेली मोट म्हणजे भारतीय संस्कृती. ती अनेक प्रसिद्ध आध्यात्मिक गुरुचे व योगशिक्षकांचे आश्रयस्थान आहे. भारतीय संस्कृतीला स्वतंत्र अशी वेगळी वैशिष्ट्ये आणि

परंपरा लाभलेली आहे. भारतीय संस्कृती ही अति प्राचीन संस्कृती आहे. वैदिक साहित्य हे भारतीय संस्कृतीचे मूळ साधन ग्रंथ आहे.

भारतीय संस्कृतीचा पाया 'वेद' मानला जातो. वेद म्हणजे ज्ञान. ज्ञानाच्या अधिकानावर आधारित अशी ही संस्कृती आहे. वेद आपले सर्वाधिक प्राचीन साहित्य मानले जातात. वेदांची निर्मिती अनेक ऋषींनी केलेली आहे. वेदांमधील काही सूक्त हे स्त्रियांनीही रचलेले आहे. वैदिक साहित्याची भाषा संस्कृत होती. वैदिक वाङ्मय अत्यंत समृद्ध आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्व वेद असे चार वेद आहे. या चार वेदांच्या ग्रंथांना संहिता असे म्हणतात. म्हणजे जाणणे त्यापासून वेद ही संज्ञा तयार झाली तिचा अर्थ ज्ञान असा होतो मौखीक पटनाच्या आधारे वेदांचे जतन केले गेले, वेदांना श्रुती असे म्हणतात.

**भारतीय संस्कृतीची महत्त्व किंवा घटतत्वे :-**

१. ज्ञान -
2. विश्वास -
3. मूल्ये व प्रमाणके -
4. चिन्हे -
5. तंत्रज्ञान –

**भारतीय संस्कृतीची कार्ये :-**

१. मानवाची जडणघडण -
2. सामाजीकरण -
3. शिक्षण व्यवस्था -
4. आर्थिक गरजांची पूर्तता -
5. सामाजिक नियंत्रण -
6. जीवनाचा आराखडा -
7. सामाजिक प्रगती –

**भारतीय ज्ञान प्रणाली** (IKS) **:-**

भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) म्हणजे भारताच्या पारंपारिक आणि आधुनिक ज्ञानाचा समग्र आहे. ज्यात वेद, उपनिषदे, आयुर्वेद, गणित, ज्योतिष, कला, स्थापत्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान यासारख्या विविध क्षेत्रांचा समावेश आहे. हे प्रणाली केवळ भूतकाळातील ज्ञानापूरती मर्यादित नसून अनुभव, निरीक्षण आणि विश्लेषणातुन विकसित झालेली ही एक जगण्याची पद्धती आहे. जी शिक्षण, आरोग्य, प्रशासन आणि तंत्रज्ञानावर परिणाम करते. ही समग्र प्रणाली मानवी जीवनातील बौद्धिक, नैतिक, शारीरिक, आणि आध्यात्मिक विकासावर भर देते.

**भारतीय ज्ञान प्रणालीची मूलतत्त्वे :-**

१. वैदिक साहित्य -
2. विज्ञान आणि तंत्रज्ञान -
3. आरोग्य आणि जीवनशैली -
4. कला आणि संस्कृती -
5. तत्त्वज्ञान आणि नैतिकता –

**भारतीय ज्ञान प्रणालीची उद्दिष्टे :-**

१. ज्ञान आणि विज्ञानाचा अनुभव, निरीक्षण आणि विश्लेषणातून विकास करणे -
2. ज्ञान हस्तांतरणासाठी गुरु -शिष्य परंपरेसारख्या प्राचीन पद्धतींचा वापर करणे -
3. समकालीन आव्हानांवर मात करण्यासाठी प्राचीन ज्ञानाचा उपयोग करणे -
4. भारताच्या बौद्धिक आणि तात्वीक परंपरांचा वारसा जतन करणे आणि त्यांचा उपयोग करणे –

**भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्व :-**

१. **समग्र दृष्टिकोन** :-

भारतीय ज्ञान प्रणाली ही केवळ एका विषयाप्रती मर्यादित नसून ती लौकिक आणि पारलौकिक , कर्म आणि धर्म यांचा समन्वय साधते

२. **विविध शाखा :-**

यामध्ये गणित, खगोलशास्त्र, वास्तुकला, वैद्यक शास्त्र, (आयुर्वेद) प्रशासन, शिक्षण आणि तत्वज्ञान यासारख्या अनेक शाखांचा समावेश होतो.

३**. ऐतिहासिक वारसा** :-

प्राचीन काळापासून आधुनिक युगापर्यंत भारतीय ज्ञान प्रणालीचा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण इतिहास आहे जो विविध ऐतिहासिक कालखंडात विकसित झाला आहे.

४. **आधुनिक महत्त्व** :-
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या माध्यमातून या ज्ञानपरंपरेला पुन्हा एकदा महत्त्व दिले जात आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या संस्कृतीचा अभिमान वाटावा आणि आधुनिक वैज्ञानिक प्रगती सोबत पारंपारिक ज्ञानाचे महत्त्व कळते.
५. **प्रसार आणि संवर्धन :-**
भारत सरकारने ज्ञान प्रणाली (IKS) विभाग स्थापन केला आहे. ज्याचा उद्देश या ज्ञानप्रणालींचा प्रसार आणि प्रचार करणे हा आहे.
६. **शाश्वतता आणि निसर्गाशी सुसंवाद** :-
भारतीय ज्ञान परंपरेमध्ये शाश्वतता आणि निसर्गाशी **सुसंवाद** यावर खूप भर दिला आहे. सेंद्रिय शेती, पीक रोटेशन, आणि पावसाच्या पाण्याची साठवण यासारख्या पारंपारिक पद्धती आजही पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन करण्यास महत्त्वाचे ठरतात.
७. **भारतीय मूल्यांचा आधार** :-
भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ ज्ञानाचा संग्रह नाही. तरती एक जीवनशैली आहे. यात नैतिकता, सदाचार आणि सामाजिक मूल्यांचा समावेश आहे. जे समाजाच्या कल्याणासाठी आवश्यक आहेत. या ज्ञानापरंपरेमुळे भारतीय संस्कृतीला एक नैतिक आणि अध्यात्मिक ओळख मिळाली आहे.
८. **अस्मितेची ओळख**
भारतीय ज्ञानपरंपरा ही भारतीय अस्मितेचा आणि ओळखिचा एक महत्त्वाचा भाग आहे. यामुळे लोकांना आपल्या प्राचीन इतिहासाशी आणि परंपरेशी जोडलेले राहण्यास मदत मिळते. आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी प्रेरणा मिळते.
९. **सर्वसमावेशक आणि गतीशीलता** :-
ही ज्ञान परंपरा सर्वसमावेशक आहे. ती कोणत्याही एका विशिष्ट विचारधारे पुरती मर्यादित नाही. यात लौकिक आणि परलौकिक कर्म आणि धर्म यांचा अद्भुत समन्वय साधलेला आहे. त्यामुळे ती काळासोबत बदलणाऱ्या गरजा नुसार स्वतः अनुकूल करून घेते.

**भारतीय ज्ञान प्रणालीची वैशिष्ट्ये :-**
भारतीय ज्ञान प्रणालीचे एक प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सर्व प्राणी आणि विश्व यांचा परस्पर संबंध आणि परस्परावलंबनावर भर देणे. '' ','वसुधेव कुटुम्बकम' किंवा 'संपूर्ण जग' हे कुटुंब आहे या संकल्पनेतून हे दिसून येते. भारतीय ज्ञान प्रणाली देखील आत्मसाक्षात्कार आणि आंतरिक परिवर्तनावर भर देते.
१. **समग्र दृष्टिकोन** :-
भारतीय ज्ञान प्रणाली मानवी जीवनाच्या विविध पैलूंना एकत्रित विचार करते यात मन, शरीर आणि आत्मा या सर्वांचा विकास करण्यावर भर देते.
ही प्रणाली केवळ बौद्धिक विकासावर लक्ष केंद्रित न करता नैतिक शारीरिक आणि अध्यात्मिक विकासालाही महत्व देते.
२. **विविधता आणि सर्वसमावेशकता** :-
या प्रणालीमध्ये तत्वज्ञान, धर्म, आयुर्वेद, ज्योतिष, वास्तुशास्त्र, संगीत, कला, साहित्य आणि विज्ञान यासारख्या विविध शाखांचा समावेश आहे. यामध्ये पारंपरिक आणि आधुनिक ज्ञान यांचा संगम आहे.
३. **परस्पर संबंधावर भर देते :-**
भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये सर्व सजीव आणि संपूर्ण विश्वाच्या परस्पर संबंधावर आणि परस्परावलंबनावर भर दिला जातो. 'वसुधेव कुटुम्बकम' (संपूर्ण जग हे कुटुंब आहे) ही संकल्पना या विचारधाराचे उत्तम उदाहरण आहे.
४. **अनुभव आधारित शिक्षणावर भर :-**
हे ज्ञान अनुभव निरीक्षण प्रयोग आणि कठोर विश्लेषणातून विकसित झाले आहे. पिढ्यानपिढ्या हस्तांतरीत करण्याचे हे एक प्राचीन आणि सिद्ध स्वरूप आहे.
५. **आत्मसाक्षात्कार आणि आंतरिक परिवर्तन :-**
या प्रणालीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे आत्मसाक्षात्कार आणि आंतरिक परिवर्तन यावर भर देणे ज्ञान केवळ बाह्य जगासाठी नसून आंतरिक प्रगतीसाठी देखील आहे.
६.**स्वदेशी आत्मनिर्भरता :-**
स्वदेशी तंत्रज्ञान आणि आत्मनिर्भरतेच्या संकल्पनांना प्रोत्साहन देते. ज्यामुळे देशाचे आर्थिक आणि बौद्धिक आत्मनिर्भरता वाढवण्यास मदत होते.
७. **शिक्षणाची सुलभता** :-
शिक्षणात सामाजिक आर्थिक अडचणी दूर करून सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करते
८. **आधुनिक समस्यांवर उपाय :-**
पर्यावरण संरक्षण, आयुर्वेद आणि शाश्वत विकासाच्या संकल्पना मधून हवामान बदल आणि आरोग्य यासारख्या आधुनिक समस्यांवर उपाय शोधण्यास मदत करते.
९. **जीवनासाठी मार्गदर्शन :-**

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

यामुळे व्यक्तीला सत्य, तत्वज्ञान, विज्ञान आणि संस्कृतीची माहिती मिळते. जी त्याला संतुलीत आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करते.

**निष्कर्ष :-**

भारतीय ज्ञान प्रणाली ही कोणत्याही भेटले का विषयापूर्ती मर्यादित नसून ती कला, विज्ञानाला, साहित्य, वेद, उपवेद, उपनिषदे, धर्म, जीवनशैली यांचा अभ्यास करण्यावर भर देते. तसेच ज्ञान हे केवळ पुस्तकी भाषेपुरते मर्यादित नसून ते अनुभव, निरीक्षण व प्रत्यक्ष कृतीतून मिळविले जाते. भारतीय ज्ञान प्रणाली ही संघटित असून ती एका पेढे कडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असते. भारतीय ज्ञानप्रणालीचा एकमय व उद्देश सर्वांचा सर्वांगीण विकास करणे असून ज्यामध्ये बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक विकासावर लक्ष केंद्रित केले जाते. भारतीय ज्ञान प्रणाली भारतीय संस्कृतीची विविधता स्वीकारते. आणि निसर्गाशी शिव संवाद साधणे व पर्यावरणाचे संरक्षण करण्याची शिकवण्यात देते.

**संदर्भ :-**

१. आरगडे, अंबादास (2022) नवीन शैक्षणिक धोरण एज्युकेशन पब्लिकेशन औरंगाबाद
२. कुमार, ममीदला, जगदेश (29 जुलै 2023) भारतीय ज्ञान प्राणालीला आलिंगन द्या उच्च शिक्षण समुच्च करा
३. सर देसाई, एस जी (2001) भारतीय तत्त्वज्ञान: वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, मुंबई लोकवाड:मय गृह.
४. द इंडियन एक्सप्रेस – 18 एप्रिल 2023

**वृत्तपत्रे :-**

१. महाराष्ट्र टाइम्स 24 सप्टेंबर 2022
2. हिंदुस्तान टाइम्स 4 एप्रिल 2023
3. इंडिया टुडे 18 फेब्रुवारी 2022